MHPU020456122025

अर्ज दाखल तारीख : १०.११.२०२५
अर्ज नोंदणी तारीख : १८.११.२०२५
न्यायनिर्णय घोषीत तारीख : ०६.०७.२०२६
कालावधीः ००वर्षे, ०७महिने, १८ दिवस

**२ रे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर पुणे यांचे न्यायालयात**
**पिठासीन अधिकारी –अमोल अ. शिंदे**

**दिवाणी चौकशी अर्ज क्र. २२१८/२०२५**
**निशाणी क्र. १**

१. **मधुकरराव दादासाहेब सकुंडे**
वय –६० , व्यवसाय – निवृत्त शिक्षक
२. **मेघमाला मधुकर सकुंडे**
वय – ३६, व्यवसाय – शिक्षक
३. **शिवरत्न मधुकर सकुंडे**
वय –३३ , व्यवसाय – शिक्षक
सर्व रा. वैष्णवी निवास, सासवड,
ता.पुरंदर, जि.पुणे **.... अर्जदार**

**वि.**

**कोणीही नाही** **....गैरअर्जदार**

**अर्ज : – भारतीय वारसा कायदा कलम ३७२ प्रमाणे उत्तरधिकारी प्रमाणपत्र मिळणेबाबत.**

---------------------------------------

अर्जदारांतर्फे वकील – श्री. आर.डी.कदम

---------------------------------------

## न्यायनिर्णय

## (पारित दिनांक ०६/०७/२०२६)

१. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज भारतीय वारसा कायदा १९२५ चे कलम ३७२ प्रमाणे उत्तरधिकारी प्रमाणपत्र मिळणेकरिता दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार नं. १ हे अर्जदार नं. २ व ३ यांचे वडील असुन अर्जदार नं. २ व ३ सख्खे बहिण–भाऊ आहेत. सर्व अर्जदार हे सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे येथील रहिवासी आहेत. अर्जदार नं.१ ची पत्नी व अर्जदार नं. २ व ३ यांची आई आशा मधुकरराव सकुंडे ही दि.०३/०७/२०२५ रोजी सासवड, ता. पुरंदर, जि.पुणे येथील धन्वंतरी हॉस्पीटलमध्ये मयत झालेली आहे. आशा मधुकरराव सकुंडे यांचे नावे पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित पुणे शाखा यवत येथे खाते नं. ०५५००१७ ०००१०७९२ असे बचत खाते असुन, त्यामध्ये आजतागायत रक्कम रुपये १७,२४,८८९/–शिल्लक आहे. अर्जदारांशिवाय त्यांना अन्य कोणी कायदेशिर वारस नाहीत. त्यामुळे अर्जदार यांना संबंधित बॅक अधिकारी यांनी उत्तरधिकारी प्रमाणपत्राची मागणी केल्यामुळे अर्जदारांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. प्रस्तुतचा अर्ज दाखल झाल्यानंतर अर्जदारांशिवाय इतर कोणी वारस आहेत का याची खात्री करण्यासाठी दि. २३/१२/२०२५ रोजी प्रभात या वर्तमानपत्रात जाहिर नोटीस देण्यात आली. परंतु अर्ज दाखल तारखेपासुन आजपर्यंत सदर रकमेच्या अनुषंगाने कोणीही कसल्याही स्वरुपाचा आक्षेप नोंदविलेला नाही.

४. अर्जातील कथनावरुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले असून त्याचे कारणांसह मी खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | अर्जदार नं.१ ते ३ यांनी मयत आशा मधुकरराव सकुंडे यांचे उत्तरधिकारी आहेत हे अर्जदारांनी सिध्द केले आहे काय ? | **...होय.** |
| ०२. | अर्जदार नं.१ ते ३ हे उत्तरधिकारी प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे काय ? | **...होय.** |
| ०३. | कोणते आदेश ? | **अर्ज मंजूर करण्यात येत आहे.** |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र. १ व २ बाबत –**

५. उपरोक्त दोन्हीही मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने एकत्रीतरित्या

विचारात घेण्यात आले. अर्जदार नं.१ ते ३ यांना निशाणी क्र.८,१६ व १७ वर त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले असून त्यामध्ये असे कथन केले आहे की, कै. आशा यांना अर्जदार नं.१ ते ३ यांचे शिवाय अन्य कोणीही वारस नाहीत. तसेच कै. आशा यांच्या मृत्युप्रमाणपत्राची प्रमाणित सत्यप्रत नि. ९ कडे आहे. कै. आशा मधुकरराव सकुंडे यांचे नावे पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक मर्यादित पुणे येथील बॅंकेतील खाते पुस्तकाचे दर्शनी पान नि. १० कडे आहे. अर्जदार नं. १ ते ३ यांचे आधार कार्डची प्रत अनुक्रमे नि. ११ ते १३ कडे दाखल आहे. अर्जदार नं. १ व २ यांचे पॅन कार्डची प्रत अनुक्रमे नि. १४ व १५ कडे दाखल आहे.

६. अभिलेखावरील दाखल कागदपत्रांचे आणि अर्जदारांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, कै. आशा यांना अर्जदारांशिवाय अन्य कोणीही वारस नाही. निशाणी क्र. १० चे अवलोकन केले असता बॅंकेतील रक्कम ही कै. आशा यांच्या नावे असल्याचे स्पष्ट होते.

७. अर्जदार हे सज्ञान असल्यामुळे त्यांना योग्य ते न्यायालयीन शुल्क भरावे लागणार आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ व २ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.३ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करित आहे.

## आदेश

१. अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार नं. १ ते ३ यांना असे उत्तरधिकारी प्रमाणपत्र देण्यात येते की, ते कै. आशा मधुकरराव सकुंडे यांचे कायदेशीर उत्तरधिकारी असुन, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित पुणे शाखा यवत येथे खाते नं. ०५५००१७०००१०७९२ असे बचत खातेमधील रक्कम रुपये १७,२४,८८९/– मिळणेस अधिकृतरित्या पात्र आहेत.

३. अर्जदार नं.१ ते ३ यांनी योग्य ते न्यायालयिन शुल्क या आदेशापासून एका महिन्याच्या आत भरावे. सदर न्यायालयित शुल्क भरल्यानंतर अर्जदार नं.१ ते ३ यांना उत्तरधिकारी प्रमाणपत्र देण्यात यावे.

Digitally signed by AMOL ASHOK SHINDE
Date: 2026.07.06 17:40:03 +0530

(श्री. अमोल अ. शिंदे)
दिनांक ०६/०७/२०२६ २रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
पुणे.